# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/07/2023 (बुधवार) दुपार

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन सावनेरची कार्यवाही

दिनांक ०४/०७/२०२३ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे सावनेर हद्दीतील हनुमान मंदिर समोर सावनेर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ याने नमुद घटनास्थळी जावुन टिप्पर क्र. एम. एच.— ४० वाय.— ७९९५ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक **आरोपी नामे— १) अक्षय दिलीप दियेवार, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. १३ चिचपूरा खापा ता. सावनेर २) क्लिनर नामे— पवन सेवकराम लाटकर, वय १९ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ नंदापुर ता. सावनेर** यांनी संगनमत करून त्यांचे ताब्यातील टिप्परमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून १) ०६ ब्रॉस रेती किंमती अंदाजे १५,०००/—रु. २) टिप्पर क्र. एम. एच.— ४०/वाय— ७९९५ किंमती १०,००,००० /—रु , ३) दोन वेगवेगळया कंपनीचे ॲन्ड्राईड मोबाईल किंमती अंदाजे १०,०००/— रु. असा एकूण १०,२५,०००/— रुपयाचा मुद्देमाल वाहतूक करतांना मिळून आल्याने आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस हवालदार श्री. संजय शिंदे ब. नं. ११६१ पोस्टे सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हावरे ब. नं. १५४६ पोस्टे सावनेर मो. नं. ९९२३६५६२२ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील चमरी गेट खापरखेडा येथे दिनांक ०३/०७/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक ०४/०७/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विवेक कृष्णाजी लाडकर, वय २१ वर्ष, रा. नविन बिना भानेगांव यांचे खापरखेडा चमरी गेट जवळ बालाजी मोबाईल शॉप दुकान आहे. फिर्यादी हा दुकान बंद करुन घरी गेला होता. दिनांक ०४/०७/२०२३ रोजी ८.०० वा. दुकान उघडण्याकरीता आला असता शटरचे कुलुप तोडलेले दिसले आत जावुन पाहीले असता जुने मोबाईल ३ नग किंमती अंदाजे १०,०००/— रु व आयफोन कंपनीचे २ एअरफोन किंमती अंदाजे २०,०००/— रु. असा एकुण ३०,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार पोलीस स्टेशन खापरखेडा मो. नं. ९८८११४३९२७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**